महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. पीआर-३/कृषी संजीवनी/ No 26424** **दिनांक : 14 SEP 2012**

**वाणिज्य परिपत्रक क्र.** १७६

**विषय : कृषी ग्राहकांकडील थकबाकी वसुलीकरिता "कृषी संजीवनी योजना-२०११" ची अंमलबजावणी व शेवटचे वीज देयक निर्गमित करण्याकरिता अंगीकारलेली पध्दत.**

**संदर्भ :** १) वाणिज्य परिपत्रक क्र. १३४ दि. ०१.०४.२०११.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. १५३ दि. ०३.०१.२०१२.
३) मंडळ निर्णय क्र. १५८ दि. ०५.०७.२०१२.

वरील संदर्भिय वाणिज्य परिपत्रक क्र. १३४ व शासन निर्णय दि. ०६.०४.२०११ अन्वये महाराष्ट्र शासन व महावितरण कंपनीने कृषी ग्राहकांकरीता **"कृषी संजीवनी योजना-२०११"** ही योजना राबविण्यात आलेली होती. सदर योजनेला संदर्भातील वाणिज्य परिपत्रक क्र. १५३ अन्वये ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर योजनेनुसार या योजनेत सहभाग घेतलेल्या कृषी ग्राहकांना योजनेच्या कालावधीतील चालू विज देयकांचा भरणा योजना संपेपर्यंत नियमित करावयाचा होता. शेतीपंपाच्या थकीत वीज देयकात सवलत देण्याविषयी आणि त्याचसोबत म.रा.वि.वि.कंपनीचा महसुल वाढविण्यासाठी राबविण्यात आली. म्हणजेच योजनेच्या कालावधीतील वीज देयकांचा भरणा देय दिनांकाच्या आधी करावयाचा होता.

**"कृषी संजीवनी योजना-२०११"** ची अंमलबजावणी करताना असे आढळून आले की, काही ग्राहकांनी योजनेच्या कालावधीतील चालू विज देयकांचा भरणा देय दिनांकानंतर परंतु योजनेच्या कालावधीत केल्यामुळे योजनेच्या अटीप्रमाणे अशा ग्राहकांना योजनेत सहभाग घेऊनही सदर योजनेचा लाभ देता येत नव्हता.

वरील बाबीचा विचार करता ज्या कृषी ग्राहकाने योजनेमध्ये सहभाग घेतलेला होता परंतु त्यांनी त्या कालावधीतील चालू देयकांचा भरणा देय दिनांकानंतर व योजनेच्या कालावधीत केलेला असल्यास अशा ग्राहकांना योजनेचा लाभ घेता यावा याकरिता सक्षम अधिका-यांनी खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

ज्या कृषी ग्राहकांनी जानेवारी २०११ ते मार्च २०१२ या कालावधीतील त्यांच्या चालू वीज देयकांचा भरणा संबंधीत महिन्याच्या देय दिनाकांनतर परंतु **"कृषी संजीवनी योजना-२०११"** च्या कालावधीत केलेला आहे अशा कृषी ग्राहकांना त्यांनी चालू विज देयकांचा भरणा नियमित केलेला आहे असे समजण्यात यावे व त्यांना **"कृषी संजीवनी योजना-२०११"** चे सर्व लाभ देण्यात यावेत.

सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात येते की, वरील निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावयणी करण्यात यावी.

(सही)
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना : प्रेक्षण यादीप्रमाणे**

D:\□□□□□□\KSY\KSY २०११_Circular_Implement.doc